वाचले :-

१ कर्मचारी निवड समिती सभा दि. २७/०३/२०२३ चा सभावृत्तांत

२ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम दुसरी सुधारणा २०११ नुसार कलम ५३(३)

३ डॉ.बापट चैतन्य सुधीर,वैद्यकीय अधिकारी यांचा पोलिस कार्यालयांमार्फत प्राप्त झालेले अनुकुल चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल

४ मा. आयुक्त सो यांचेकडील दिनांक ०४/१० /२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८ सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१/कावि/३५३/२०२४,
दिनांक ०७/ १० /२०२४

**विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.)',गट-ब या पदावर सरळसेवा प्रवेशाने नियुक्ती देणेबाबत...**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागाच्या आस्थापनेवर 'वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.)' या अभिनामाची पदे पे लेवल- S-२०-५६१००-१७७५०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असलेली पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेकरीता जाहिरात क्र.१२६५/२०२१ दिनांक ११/१२/२०२१ अन्वये वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात येऊन व पिंपरी चिंचवड मनपाचे अंतर्गत परिपत्रकाव्दारे अर्हताधारक कर्मचा-यांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. वैद्यकीय अधिकारी पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांच्या ऑनलाईन परिक्षा दिनांक २५/०६/२०२२ रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

वैद्यकीय अधिकारी पदावरील उमेदवारांना भरावयाचे पदसंख्येचे अनुषंगाने आरक्षण विचारात घेऊन १:३ या प्रमाणात समान गुण मिळालेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकामी दि.०८/०८/२०२२ रोजी बोलविले होते. कागदपत्रे पडताळणीकामी उपस्थित असलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र, संगणक अर्हता, क्रिमिलेअर/नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, उमेदवारांचे वय, जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची पडताळणी सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात आली. दिनांक २७/०३/२०२३ रोजीचे कर्मचारी निवड समितीने वैद्यकीय अधिकारी पदाकरीता कागदपत्रे पडताळणीस हजर असलेल्या उमेदवारांच्या सर्वसाधारण गुणानुक्रम यादीनुसार प्रवर्गनिहाय निवड व प्रतिक्षा यादी तयार करुन प्रमाणित केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम दुसरी सुधारणा २०११ नुसार कलम ५३(३) मध्ये सुधारणा करण्यात आलेली असून सहाय्यक आयुक्त पदापेक्षा कमी दर्जाचे अधिकारी/कर्मचारी नियुक्तीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना आहेत.

सबब, मी,आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, डॉ.धुमाळ बाळासाहेब तानाजी यांची निवड रद्द केल्याने वैद्यकीय अधिकारी पदाकरीता प्रतिक्षा यादीवरील खालील उमेदवारांस त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या प्रवर्गामधून "वैद्यकीय अधिकारी" (एम.बी.बी.एस.) गट 'ब' या पदावर पे लेवल S-२०-५६१००-१७७५०० (सातव्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र. | उमदेवाराचे नाव | प्रवर्ग | गुणानुक्रम |
|---|---|---|---|
| १ | डॉ.बापट चैतन्य सुधीर | खुला | १६ |

डॉ.बापट चैतन्य सुधीर,वैद्यकीय अधिकारी यांचा उपरोक्त वाचले क्र. ०३ अन्वये संबंधित पोलिस कार्यालयाकडून चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल अनुकुल प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त नमूद 'वैद्यकीय अधिकारी' यांना निसंदिग्धपणे समज देण्यात येते की, प्रस्तुतच्या आदेशान्वये त्यांची 'वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.)' गट ब या पदावर करण्यात आलेली नेमणूक ही प्रथमत: ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असून त्याकरीता खालीलप्रमाणे अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

***अटी व शर्ती*:-**

१.'वैद्यकीय अधिकारी' या पदावर करण्यात आलेली नियुक्ती ही २ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता करण्यात आलेली असली तरी जोपर्यंत नियुक्ती नियमित वेतनश्रेणीत केली जाणार नाही, तोपर्यंत नियुक्ती परिविक्षाधीन कालावधीची राहील. तसेच परिविक्षाधीन कालावधी वाढविल्यास त्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ३९ नुसार कार्यवाही करणेत येईल.

२.'वैद्यकीय अधिकारी' या पदावर महानगरपालिकेच्या सेवेत रूजू होण्यापूर्वी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ यांचे नावे बँक ऑफ बडोदा (विस्तार शाखा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आवार पिंपरी ४११ ०१८) यांचेकडील र. रुपये १,००,०००/- ची राष्ट्रीयकृत बँकेची ५ वर्षे मुदतीची Irrevocable Bank Guarantee द्यावी लागेल. तसेच र.रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर किमान ५ वर्ष महानगरपालिका सेवेत नोकरी करणेस संमती असलेबाबत सर्व्हिस बॉण्ड लिहून द्यावा लागेल.

३.'वैद्यकीय अधिकारी' पदावर रुजू झालेचे तारखेपासून ५ वर्ष कालावधीपर्यंत महापालिका सेवा सोडता येणार नाही व तसे करावयाचे झाल्यास र.रु.१,००,०००/- ची राष्ट्रीयकृत बँकेची Irrevocable Bank Guarantee जप्त करणेत येऊन सदरचे र.रु.१,००,०००/- महापालिका कोषागारात जमा करणेत येतील.

४.नेमणुकीचे पदावर ५ वर्षाचे कालावधीमध्ये किंवा त्यापुढील कालावधीमध्ये उमेदवारांस महापालिका सेवेत नोकरी करावयाची नसल्यास किंवा महापालिका सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिना आगाऊ लेखी नोटीस द्यावी लागेल. आगाऊ लेखी नोटीस न दिलेस **एक महिन्याचे मूळ वेतन महानगरपालिका** कोषागारात रोख स्वरुपात भरुन राजीनामा नोटीस व सोबत भरणा पावती जोडावी लागेल. त्यानंतरच राजीनामा मंजूरीचे संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल. राजीनामा मंजूर होईतोपर्यंत अन्य कोणत्याही ठिकाणी नोकरी केल्याचे आढळून आलेस आपण नियमानुसार कारवाई करणेस पात्र ठराल. तसेच त्याबाबत महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल यांना नियमबाह्य खाजगी व्यवसायाबद्दल सूचित करण्यात येईल.

५.महापालिका सेवेत रूजू झाल्यानंतर स्थायी वैद्यकीय मंडळ, ससून सर्वोपचार रुग्णालय,पुणे यांचेकडील वैद्यकीय दृष्ट्या कामास पात्र असलेबाबतचा दाखला १ वर्षामध्ये सादर करावा लागेल. स्थायी वैद्यकीय मंडळाने आपणांस अपात्र ठरविलेस तात्काळ आपली सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

६.महापालिका सेवेत रुजू होताना सक्षम प्राधिकरणाने दिलेला जन्मनोंद दाखला, शैक्षणिक अर्हता, तांत्रिक पात्रता, शाळा सोडल्याचा दाखला, जातीविषयक दाखला व जातवैधता प्रमाणपत्र महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र(अद्ययावत नुतनीकरणासह) इ. दाखल्याच्या मूळ प्रती(Original Certificates) सोबत आणणे आवश्यक आहे. मूळ दाखले सोबत न आणलेस रुजू करुन घेतले जाणार नाही. त्याचप्रमाणे उक्त कागदपत्रांच्या प्रत्येकी साक्षांकित छायांकित प्रती सामान्य प्रशासन विभागात सादर कराव्यात.

७.'वैद्यकीय अधिकारी' या पदावर रुजू होण्यासाठी येताना नव्याने काढलेल्या आयडेंटी कार्ड साईज छायाचित्राच्या (फोटोच्या) कोणत्याही शासकीय राजपत्रित अधिका-याने/नोटरी यांनी प्रमाणित केलेल्या दोन प्रती सादर कराव्या लागतील, त्याशिवाय रुजू करुन घेतले जाणार नाही.

८.महापालिकेने प्रशिक्षणासाठी निवड केल्यास प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल व घेतलेल्या प्रशिक्षणानुसार व्यवस्थापनाने जी जबाबदारी सोपविली असेल ती पार पाडणे बंधनकारक राहील व ती जबाबदारी कर्तव्याचा भाग म्हणून राहील.

९.महापालिकेच्या शवविच्छेदन गृहात(Post Mortem Center)/रुग्णालयात/दवाखान्यात/ कामकाजाच्या सोईनुसार काम करावे लागेल व कामाच्या वेळेनुसार शिफ्टड्युटीमध्ये (पाळीपध्दत) काम करावे लागेल व प्रशासकीय कारणास्तव दिलेल्या बदलीच्या ठिकाणी काम करावे लागेल.

१०.तातडीच्या कामकाजाकरीता(इमर्जन्सी) नेमून दिलेल्या कामकाज वेळेव्यतिरिक्त व्यवस्थापनाने बोलविल्यास कामावर हजर रहावे लागेल व तो कामकाजाचा भाग राहील

११.महानगरपालिकेने स्वीकारलेले सेवानियम अथवा सेवानियमाबाबत केलेले उपविधी किंवा सध्या अस्तित्वात असलेले सेवानियम व भविष्यात अंमलात येणारे सेवानियम व अटी आपल्यावर बंधनकारक राहतील.

१२.महापालिकेच्या सेवेत रूजू झाल्यानंतर खाजगी व्यवसाय महापालिका परिसरात अथवा महानगरपालिका परिसर सोडून अन्य ठिकाणी करता येणार नाही, तसे आढळून आल्यास नियमाधीन कारवाई करण्यात येईल.याबाबत सध्या अस्तित्वात असलेले व वेळोवेळी अंमलात येणारे नियम लागू राहतील.

१३.प्रस्तुतच्या आदेशान्वये करण्यात आलेली नेमणूक ही २ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता हंगामी स्वरुपाची असून, या मुदतीत नेमणूक दिलेल्या पदावरील वर्तणूक, उपस्थिती, कामकाज असमाधानकारक आढळलेस, विनापरवाना गैरहजर राहिलेस नेमणुकीचे पदावर नियमित नेमणूक करण्याकामी विचार केला जाणार नाही. तसेच ताबडतोब महापालिका सेवेतून पूर्वसूचना न देता सेवेतून कमी केले जाईल व त्याबाबत अट क्र. २ प्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेची Irrevocable Bank Guarantee ची रक्कम जप्त करणेत येऊन सदरचे र.रु. १,००,०००/- महापालिका कोषागारात जमा करण्यात येतील.

१४. शासन निर्णय क्र. अंनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ नुसार नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजेच 'परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना' (Defined Contribution Pension system) लागू राहील. तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांनी शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२१/प्र.क्र.११९/नवि-२०,दि.२२/०२/२०२२ नुसार महानगरपालिकेतील अधिकारी/ कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेनत योजना (National Pension System) लागू झाल्यास भविष्यात सदरची योजना लागू राहील.

१५.महाराष्ट्र शासन निर्णय दि. ०४ फेब्रुवारी २०१३, दि.३१ मार्च,२०१७ व दिनांक ०८ जानेवारी २०१८ नुसार संगणक अर्हता प्राप्त केलेबाबत १ वर्षाचे आत प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा आपली सेवा समाप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

१६.सेवेत रुजू होताना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ नुसार प्रतिज्ञापन र.रु.५००/-चे स्टॅम्प पेपरवर सादर करावे लागेल.

१७.आपण कोणत्याही शासकीय/निमशासकीय अथवा खाजगी कार्यालयात/संस्थेत काम करीत असल्यास महापालिका सेवेत रूजू होताना यापूर्वीचे नोकरीचे राजीनामापत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित नमुन्यात र.रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१८.'वैद्यकीय अधिकारी' या पदावर रुजू होणा-या उमेदवारांची सेवाज्येष्ठता सर्वसाधारण (General) गुणानुक्रमानुसार राहील.

१९. शासन परिपत्रक क्र.सीडीआर-१०१०/प्र.क्र.५५४/पुनर्बांधणी ७०/११, दि.११ नोव्हेंबर २०१४ नुसार भारतीय संविधानाशी एकनिष्ठता बाळगण्याची शपथ घ्यावी लागेल.

२०.नेमणुकीचे संदर्भात दिलेली माहिती (शैक्षणिक अर्हता, तांत्रिक पात्रता, जन्मतारीख, अनुभव) खोटी आहे असे निदर्शनास आल्यास कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना अथवा कारणे दाखवा नोटीस न बजावता पिंपरी चिंचवड महापालिका सेवेतून कमी केले जाईल व त्याबाबत कोर्टात दाद मागता येणार नाही व राष्ट्रीयकृत बँकेची Irrevocable Bank Guarantee ची रक्कम जप्त करण्यात येईल.

२१.सदर नेमणुकीचे आदेश प्राप्त झालेचे तारखेपासून ३० दिवसाच्या आत महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागात रूजू व्हावे लागेल. दिलेल्या मुदतीत रुजू न झाल्यास आपली 'वैद्यकीय अधिकारी' या पदावर करण्यात आलेली नेमणूक रद्द समजण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

सही/-
(शेखर सिंह )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति, डॉ.बापट चैतन्य सुधीर

प्रत- १.लेखा विभाग २.लेखापरिक्षण विभाग ३. साप्रवि टेबल क्र.७,९,१०,१२,१४, संगणक कक्ष
४.सर्व संबंधित विभाग ५. वैद्यकीय विभाग

सहायक आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८